## चतुत्थो पाठो ।

# कसिभारद्वाज सुत्तं !

जागतिक वाङ्‌मयीन दर्जा प्राप्त असलेल्या 'पालि तिपिटका'तील 'सुत्तपिटका'मध्ये 'खुद्दकनिकाय' या ग्रंथाचा समावेश होतो. खुद्दकनिकाय ग्रंथामध्ये १५ ग्रंथांचा अंतर्भाव होत असून त्यांपैकी ५वा ग्रंथ 'सुत्तनिपात' होय. हा ग्रंथ अत्यंत प्राचीन ग्रंथ म्हणून वाखाणण्यात आलेला आहे.

प्रस्तुत पद्यपाठ 'सुत्तनिपात' मधून घेतला आहे. यामध्ये कसिभारद्वाज ब्राह्मण व तथागत बुद्ध यांचा शेतीविषयी संवाद आहे. मीसुद्धा तुझ्यासारखाच एक शेतकरी आहे. मी मनाची मशागत करतो आणि या शेतीपासून चिरंतन फळ प्राप्त करतो.

---

''कस्सको पटिजानासि, न च पस्साम ते कसिं ।
कसिं नो पुच्छितो ब्रूहि, यथा जानेमु ते कसिं'' ॥१॥


''सद्धा बीजं तपो वुट्ठि, पञ्ञा मे युगनङ्गलं
हिरि ईसा मनो योत्तं, सति मे फालपाचनं ॥२॥

कायगुत्तो वचीगुत्तो, आहारे उदरे यत्तो ।
सच्चं करोमि निद्दानं, सोरच्चं मे पमोचनं ॥३॥

विरियं मे धुरधोरय्हं, योगक्खेमाधिवाहनं ।
गच्छति अनिवत्तन्तं, यत्थ गन्त्वा न सोचति ॥४॥

एवमेसा कसी कट्ठा, सा होति अमतप्फला ।
एतं कसिं कसित्वान, सब्बदुक्खा पमुच्चती'' ति ॥५॥

*(सुत्तनिपात)*



## सद्दत्थ (शब्दार्थ)

**कस्सको पटिजानसि** - (स्वतःला) शेतकरी म्हणवतोय
**कसिं** (स्त्री.) - शेती, कृषी
**ब्रूहि** (ब्रूति क्रि.) - साग
**वुट्ठि** (स्त्री.) - वर्षा, पाऊस
**युगनङ्गलं** (नपुं.) - जोखड, नांगर
**ईसा** (स्त्री.) - चाबूक
**योत्तं** (नपुं.) - जोखड, जू
**धुरधोरय्ह** (नपुं.) - जोखडाला बांधलेला बैल
**कसित्वान** (पूर्वकाळवाचक त्वान्त अव्यय) - नांगरून

**पस्साम** (दिस) व.का.प्र.पु.अ.) - आम्ही पाहतो
**पुच्छितो** (वि.) - विचारलेला
**यथाजानेमु** (जानति क्रि.) - ज्या प्रकारे कळेल
**पञ्ञा** (स्त्री.) - ज्ञान, बुद्धी
**हिरि** (स्त्री.) - वाईट कृत्याबद्दल वाटणारी लाज
**निद्दानं** (नपुं.) - कापणी यंत्र
**सोरच्चं** (नपुं.) - नम्रता, विनयशीलता
**अनिवत्तन्त** (वि.) - न परतणाऱ्याला

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) शेतकऱ्याला शेतीसाठी कोणत्या साधनांची आवश्यकता असते ?

(२) मनाची मशागत करताना कोणती अवजारे तथागत बुद्धांनी वापरली आहेत ?

### टिपण

- शेतकऱ्यांना बुद्धाने सरळ व सोप्या भाषेत धम्माची शिकवण दिली.
- सद्धा, तपो, पञ्ञा, सति अर्थ समजून घेऊन अंगीकार करणे.

★ ★ ★